# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा,ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि.१६/०९/२०२५**

**जिल्हा : जळगाव**

**हवामान अंदाज :**

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१६/०९/२०२५ ते २०/०९/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| पाऊस (मिमी) | 15 | 13 | 6 | 5 | 5 |
| कमाल तापमान (अं.से.) | 30 | 30 | 32 | 32 | 33 |
| किमान तापमान (अं.से.) | 24 | 25 | 25 | 24 | 23 |
| ढग स्थिती (आकाश) | 7 | 7 | 7 | 7 | 7 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 98 | 98 | 98 | 99 | 97 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 72 | 71 | 75 | 77 | 75 |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 7 | 7 | 6 | 8 | 9 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 288 | 285 | 280 | 278 | 284 |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक १६ सप्टेंबर, २०२५ रोजी बऱ्याच (जिल्ह्याच्या सुमारे ५१–७५ %) ठिकाणी तर दिनांक १७ सप्टेंबर, २०२५ रोजी काही (जिल्ह्याच्या सुमारे २६–५० % ) ठिकाणी तर दिनांक १८, १९ व २० सप्टेंबर, २०२५ रोजी तुरळक (जिल्ह्याच्या सुमारे ०–२५ %) ठिकाणी पावसाची शक्यता आहे.<br>ईशारा : भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक १६ सप्टेंबर, २०२५ रोजी तुरळक ठिकाणी वादळी वारा (३० ते ४० किमी/तास) , मेघगर्जना, विजासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक २१ सप्टेंबर, २०२५ ते २७ सप्टेंबर, २०२५ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याने शेतातील अतिरिक्त पावसाच्या पाण्याचा निचरा करावा.<br>• पिकाचे कीड व रोगासंदर्भात नियमित सर्वेक्षण करून, जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास, विविध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• पावसाळयामध्ये फवारणी करताना स्टिकर, मिनरल ओईल इ. वापरावे.<br>• कीटकनाशक आणि तणनाशकाची फवारणी करताना वेगवेगळी करावी.<br>• सतत आणि अधूनमधून पडणाऱ्या पावसामुळे तण मोठ्या प्रमाणावर वाढतात आणि त्याच्या नियंत्रणासाठी ग्लायफोसेट ४१% ईसी २ ते ४ लिटर प्रति हेक्टर ५००-७०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करा , स्टिकर वापरा आणि पाऊस नसताना फवारणी करा.<br>• रब्बी हंगामासाठी शेत तयार करावे जेणेकरून रब्बी पिकांची पेरणी वेळेवर करता येईल.<br>• सध्याच्या ढगाळ व पावसाळी हवामानामुळे रोगांच्या नियंत्रणासाठी फळबागेमध्ये ०.५ ते १ टक्के बोर्डो ची फवारणी करावी.<br>• हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामा नाचा पूर्वानुमाना करिता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर |

| | | |
|---|---|---|
| | | करावा.<br>• मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषिदर्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा. |
| **कापूस** | फुले उमलणे ते बोंडे लागण | पिकावरील मावा व तुडतुड्यांच्या नियंत्रणासाठी ५% निंबोळी अर्काची फवारणी , क्रायसोपा अंडी ५००००/- प्रति हेक्टरी पिकावर सोडावीत , फ्लोनिकॅमिड ५० डब्ल्यू. जी. २ ग्रॅम किंवा बुप्रोफेझीन २५ एससी २० मिली किंवा डायफेन्थुरॉन ५० डब्ल्युपी १२ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप बघून फवारावे. हुमणी अळीच्या नियंत्रणासाठी मेटारायाझीयम अनिसोप्ली ५० ग्रॅम प्रति १० लि. पाण्यात मिसळून आळवणी करावी. आंतरमशागतीच्या वेळेस अळया गोळा करून नष्ट कराव्यात. पीक ८० ते ९० दिवसांचे झाल्यावर झाडाच्या मुख्य फांदीचा शेंडा खुडावा , यामुळे पिकाची कायिक वाढ मर्यादित राहते , सर्व बोंडाची वाढ चांगली होते. पिकात हवा खेळती राहते. बोंडे सडत नाहीत व कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो. |
| **सोयाबीन** | शेंगा भरण्याची अवस्था | सध्याच्या ढगाळ व पावसाळी हवामानामुळे पाने खाणाऱ्या आळीच्या नियंत्रणासाठी पिकामध्ये हेक्टरी ५ याप्रमाणे स्पोडोप्लुरचा वापर करून फिरोमोन सापळे लावा तसेच प्रकाश सापळयांचा ही शक्य झाल्यास वापर करावा. तसेच नियंत्रणासाठी फ्लूबेंडामाईड २० % डब्लू.जी. ६ ग्रॅम अथवा फ्लूबेंडामाईड ३९.३५% एसी ३ मिली अथवा इंडोक्झाकार्ब १५.८० % ई.सी. ६ मिली अथवा स्पिनेटोरम ११.७० % एस.सी. १० मिली प्रति १० लिटर पाण्यातून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. |
| **मका** | तुरा बाहेर पडताना व फुलोर्या त असताना अवस्था | उभ्या पिकांमध्ये अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी निंबोळी अर्क ५% किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ % एस.जी. ८ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. मात्र फवारणी केलेल्या मक्याचा वापर जनावरांच्या चा-यासाठी तसेच मका कणसांचा वापर खाण्यासाठी करु नये. |
| **तूर** | फांद्या फुटण्याची अवस्था | शेंडा पोखरणाऱ्या अळी व स्पोडोपटेरा अळीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची किंवा निंबोळीयुक्त किटकनाशक ॲझाडिरेक्टीन ०.०३ टक्के (३०० पी.पी.एम.) ५ मि.ली. प्रती लिटर पाणी किंवा इंडोक्झाकार्ब १४.५ टक्के एस.सी. प्रवाही ७ मि.ली. किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ टक्के एस.जी. ३ मि.ली. प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात सकाळी वारा शांत असताना स्टिकर १ मि.ली. मिसळून प्रती लिटर या प्रमाणे पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. |
| **मूग** | पक्वता अवस्था | पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| **उडीद** | पक्वता अवस्था | उडीद पिकाच्या च्या ७० % शेंगा परिपक्व झाल्यानंतर व पावसाची उघडीप मिळाल्यानंतर लगेच काढणी करावी. काढणी एक किंवा दोन टप्प्यांमध्ये करावी जेणेकरून दाणेगळ होणार नाही. पावसाची शक्यता असल्याने वेळेवर पेरणी केलेल्या पक्व खरीप उडीद पिकाची त्वरित काढणी करावी व काढणी केलेल्या शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| **भाजीपाला पीके** | | खरीप हंगामातील भाजीपाला पीके जसे वांगी, भेंडी, गवार इ. लागवडीनंतर रसशोषक किडींच्या जैविक नियंत्रणासाठी पीकाच्या अवस्थेनुसार पिवळे चिकट सापळे, सापळा पीके, जैविक बुरशीनाशके (मेटारायझीयम, ट्रायकोग्रामा, व्हरटीसिलीयम इ.) यांचा वापर करावा आवश्यकता असल्यास रासायनिक कीड आणि बुरशीनाशकाचा वापर करावा. |
| **वांगी** | पिक वाढीची अवस्था | शेंडा पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी लागवडीनंतर २० दिवसांनी दर आठवड्याला किडलेले शेंडे व फळे आढळल्यास ती गोळा करून नष्ट करावीत किंवा खोल खड्ड्यात पुरून टाकावी तसेच ५ % निंबोळी अर्क किंवा सायपरमेथ्रिन २५ % ई.सी. ४ मिली किंवा क्लोरोपायरीफॉस २०% ई.सी. २० मिली. किंवा स्पिनोसॅड ४५% एस.सी. ४ मिली प्रति १० लिटर पाण्यातून पावसाची उघडीप बघून साध्या हातपंपाने फवारावे. शेतामध्ये फळ पोखरणाऱ्या अळीसाठी एकरी ४० कामगंध सापळे (फनेल टाईप) वापरावेत. |
| **केळी** | पीक वाढीची अवस्था | सध्याच्या ढगाळ व पावसाळी हवामानामुळे करपा (सिगाटोका) रोगाच्या नियंत्रणासाठी रोगग्रस्त पानाचा भाग / पाने काढून जाळावीत. तसेच मेटीरम ५५ टके + पायऱ्याक्लोस्ट्रोबिन ५ टक्के (६० टक्के डब्लु जी) ३० ग्रॅम १० लीटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. त्यानंतर १५ ते २० दिवसांच्या अंतराने २ फवारण्या कराव्यात. पीक काढणीच्या (निर्यात मालासाठी) अगोदर फवारणी करताना मिनरल ओईलचा वापर टाळावा. वाऱ्याचा वेग वाढण्याची शक्यता असल्याने झाडे पडू नयेत म्हणून काठीचा आधार द्यावा . पावसाची शक्यता असल्याने शेतातील अतिरिक्त पावसाच्या पाण्याचा निचरा करावा. सध्याच्या ढगाळ हवामानामुळे फुलकिडीच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड ५ मिली प्रति १० लीटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. |
| **जनावरांचे व्यवस्थापन** | | जनावरांच्या पिण्यात दूषित किंवा गाळ मिश्रित पाणी जाणार नाही याची काळजी घ्यावी. जनावरांचे जंत निर्मूलन करून घ्यावे. कोवळया गवतामुळे होणारी बुळकांडी रोगाकरिता सल्फा गोळयाचा वापर करावा. जनावरांना मोकळया जागेत बांधू नये. त्यांना गोठा, शेड किंवा मजबूत इमारतीत ठेवावे. |

***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी**

**घ्यावी तसेच फवारणी करिता किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.**

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान :-

ठिकाण : कृ .म.वि., पुणे.

दि. : १६.०९.२०२५

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**

**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**